MHOS150012792023

## : निशाणी क्र. १ वरील आदेश :
## (दिनांकः—२१/०६/२०२४)

अर्जदार बालाजी मोहन भालेराव, रा. धोत्री, ता. परंडा, जि. धाराशिव (उस्मानाबाद) यांनी प्रस्तुतचा अर्ज जन्म—मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये त्यांचा जन्म दिनांक १०/०५/१९९६ रोजी मौजे रा. धोत्री, ता. परंडा, जि. धाराशिव (उस्मानाबाद) येथे झाल्याची नोंद करणे बाबत जाबदेणार यांना हुकूम करण्यासाठी दाखल केला आहे.

२. जाबदेणार यांना नि. ५/१ अन्वये नोटीस मिळून देखील ते हजर झाले नाहीत. त्यामुळे त्यांचेविरुध्द एकतर्फा प्रकरण चालविणेचा आदेश पारीत करण्यात आला.

३. अर्जदाराची अर्जातील कथने व अभिलेखावरील पुराव्यावरून निम्ननिलिखित मुद्दे प्रस्थापित झाले असून त्याचे निष्कर्ष मी कारणासहीत नमूद केले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार यांनी दाखल केलेला अर्ज मंजूर होणेस पात्र आहे काय? | होय. |
| २ | कोणता आदेश? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणीमिमांसा

**४.** अर्जातील कथनांचे पुष्टयर्थ अर्जदार बालाजी मोहन भालेराव (सा.क्र. १) यांनी नि.क्र. १० कडे त्यांचे पुराव्याचे शपथपत्र सादर केले आहे. याशिवाय, अर्जदार यांनी दैनिक संघर्ष समाजवादाचा या वृत्तपत्रातील दिनांक ०१/१०/२०२३ रोजीच्या आवृत्तीमधील जाहीर प्रगटन (नि.क्र.८) व ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धोत्री, यांचे दिनांक २६.०७.२०२३ रोजीचे जन्म नोंद अनुउपलब्धता प्रमाणपत्र व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धोत्री ता. परंडा यांनी दिलेला अर्जदाराचा विद्यार्थी प्रवेश निर्गम प्रमाणे नोंदणी रजिस्टर मधील उतारा सोबत दाखल केले आहे. अर्जदार यांनी नि. क्र. ११ येथे पुरसिस दाखल करुन त्यांचा पुरावा समाप्त केला आहे.

**मुद्दा क.१ करीता:—**

**५.** अर्जदार यांचे सन्माननीय विधिज्ञांचे युक्तिवाद ऐकले. अर्जदार बालाजी मोहन भालेराव (सा.क्र.१) यांनी अर्जातील कथनांचे पुष्ट्यर्थ नि.क्र. १० येथे त्यांचे पुराव्याचे शपथपत्र सादर केले आहे. अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी जन्माच्या प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

**६.** अर्जदार यानी सादर केलेला पुरावा संयुक्तीक व पुरक आहे. दिनांक ०१/१०/२०२३ रोजी 'दैनिक संघर्ष समाजवादाचा' या वृत्तपत्रामध्ये जाहीर प्रगटन (नि.क्र.८) देऊनही अद्‌यापर्यंत इतर कोणीही प्रस्तुत अर्जास प्रतिरोध केलेला नाही. अर्जदार यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, धोत्री यांच्या जन्म मृत्यू नोंदवहीमध्ये, नसल्याबाबतचे प्रमाणपत्र निशाणी क्र. ३ सोबत अभिलेखावर आहे. अर्जदार यांनी अभिलेखावर सादर केलेल्या मौखिक व कागदोपत्री पुराव्यांवर विश्वास न ठेवणेस माझ्यासमोर कोणतेही संयुक्तिक कारण नाही. जाबदेणार यांचेवतीने अर्जास व अर्जदार यांचे पुराव्यास आव्हान दिलेले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी दाखल केलेला मौखिक व कागदोपत्री पुरावा विश्वासार्ह आहे. सबब, जाबदेणार यांना अर्जदार यांचा जन्म दिनांक १०/०५/१९९६ रोजी

सदर ठिकाणी झाल्याची नोंद नोंदणी अभिलेखामध्ये नियमाप्रमाणे करणेसंबंधी आदेश देणे न्यायोचित वाटते. परिणामत: मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष मी 'होकारार्थी' असे नोंदवित आहे व खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) जाबदेणार यांना आदेशित करण्यात येते की, **अर्जदार बालाजी मोहन भालेराव** यांचा जन्म दिनांक १०/०५/१९९६ रोजी मौजे धोत्री, ता. परंडा, जि. धाराशिव (उस्मानाबाद) येथे झाल्याची नोंद नियमाप्रमाणे नोंदणी अभिलेखामध्ये करावी.

३) अर्जदार यांनी यासंबंधी नियमाप्रमाणे आवश्यक ते शुल्क भरावे.

सही/—
दिनांक:—२१/०६/२०२४ **(मयुरा.व्ही.निंबाळकर)**
ठिकाण: परांडा. ३रे प्रथमवर्ग न्यायदंाधिकारी, परंडा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. V.N.Phurade |
| Name of Court | Smt. M.V.Nimbalkar, 3rd Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Paranda |
| Date of Dictation | 21-06-2024 |
| Judgment signed by the P.O. on | 21-06-2024 |
| Judgment/Order uploaded on | 21-06-2024 |